दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२७० ●पृष्ठे-०४ ●ठाणे, शुक्रवार, १५ मार्च २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

## ‘सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला फटकारलं; ‘शरद पवारांचं फोटो आणि नाव वापरण्यास मनाई’



■नवी दिल्ली, प्रगती शर्मा:
सुप्रीम कोटार्ने अजित पवार गटाला फटकारलं आहे. सुप्रीम कोटार्ने अजित पवार गटाला शरद पवारांचं नाव आणि फोटो न वापरण्याचा आदेश दिला आहे. निवडणूक प्रचारात शरद पवारांच्या नावाचा आणि फोटोचा वापर करु नका अशा शब्दांत सुप्रीम कोटार्ने अजित पवार गटाला सुनावलं आहे. तसंच यासंबंधी लेखी हमी देण्यास सांगण्यात आलं आहे. शरद पवार गटाकडूनच यासंबंधी तक्रार करण्यात आली होती. सुनावणीदरम्यान सुप्रीम कोटार्ने आश्चर्य व्यक्त केलं. शरद पवार गटाने अजित पवार गटाविरोधात तक्रार केली होती. निवडणुकीच्या प्रचारात मतदारांना आवाहन करताना अजित पवार गटाकडून शरद पवारांच्या नावाचा आणि फोटोचा वापर केला जात असल्याचं तक्रारीत सांगण्यात आलं होतं. यावर सुप्रीम कोटार्ने आश्चर्य व्यक्त केलं.
सुप्रीम कोर्टाने सुनावणीदरम्यान अजित पवार गटाला फटकारलं. जेव्हा निवडणूक जवळ येतात तेव्हा तुम्हाला शरद पवारांची गरज वाटते. जेव्हा निवडणुका नसतात तेव्हा मात्र तुम्हाला गरज वाटत नाही. आता तुमची एक वेगळी ओळख आहे. तुम्ही मतदारांमध्ये जाताना याच नव्या ओळखीने गेलं पाहिजे अशा शब्दांत सुप्रीम कोटार्ने सुनावलं आहे.
तसंच कोर्टाने अजित पवार गटाला २ दिवसांत लेखी हमी देण्याचा आदेश दिला आहे. १९ मार्चला याप्रकरणी पुढील सुनावणी होणार आहे. दरम्यान यावर प्रतिक्रिया देताना अजित पवारांनी आपण शरद पवारांचं नाव, फोटो वापरत नसल्याचा दावा केला आहे. ‘आम्ही त्यांचे फोटो वापरले, पण त्यांनी सांगितले जर माझा फोटो वापरला तर कारवाई करावी लागेल. आम्ही सुसंस्कृत म्हणून यशवंतराव चव्हाण यांचे फोटो वापरतो. व्यक्ती ह्यात असल्यावर त्याच्या संमतीने फोटो वापरावा लागतो. आम्ही त्यांचे फोटो वापरत नाही,’ असं अजित पवार म्हणाले आहेत.

## कल्याण-भिवंडी-उल्हासनगरसाठी संयुक्त परिवहन सेवा

■मुंबई, विशाल कारंडे :
मुंबई महानगर क्षेत्रातील (एमएमआर) कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर शहर महापालिका, उल्हासनगर महापालिका, अंबरनाथ नगर परिषद आणि कुळगाव -बदलापूर नगर परिषद यांची संयुक्त परिवहन सेवा स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. संयुक्त परिवहन सेवेद्वारे मुंबई महानगर परिसरासाठी रेल्वे व्यतिरिक्त आणखी एक सक्षम सार्वजनिक वाहतूक पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार असल्यामुळे नागरिकांना दिलासा मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. या भागातील लोकांची गरज लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. या एकत्रित परिवहन सेवेमुळे



प्रवाशांना रास्त भाडयात वाहतूक सेवा मिळणार आहे. तसेच या परिसरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम होऊन वाहतूक कोंडीची समस्या कमी होण्यास मदत होईल, असा सरकारचा दावा आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिक्षेत्राच्या नजिक असलेली भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, अंबरनाथ नगर परिषद आणि कुळगांव बदलापूर नगर परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिवहन सेवा पूर्ण क्षमतेने चालत नसल्याचे सिद्ध झाले आहे.

## फक्त महापालिका क्षेत्रातील महिलांनाच टीएमटीतील सवलतीचा प्रवास

■ ठाणे, प्रतिनिधी :
ठाणे महापालिकेच्या परिवहन उपक्रमांतर्गत महिलांना तिकीटामध्ये ५० टक्के सवलत तसेच ६० वर्षांवरील नागरिकांना मोफत प्रवास देण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु हा निर्णय ठाणे महापालिका क्षेत्रातील म्हणजेच, ठाणे, कळवा, मुंब्रा आणि दिवा शहरातील नागरिकांना लागू असणार आहे. प्रवाशांना सवलत मिळविण्यासाठी ओळखपत्र सोबत ठेवावे लागणार आहे. त्यामुळे ठाण्याबाहेरून शहरात नोकरी किंवा कामानिमित्त येणाऱ्या महिला प्रवासी, जेष्ठ नागरिकांना सवलत किंवा मोफत प्रवास करता येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात गेल्याकाही वर्षांपासून लोकसंख्या वाढली आहे. तसेच ठाणे शहरातील वागळेइस्टेट, घोडबंदर भागात मोठ्या



कंपन्या, लघु उद्योगांची कार्यालये आहेत. येथील हजारो महिला आणि पुरूष कामगार प्रवासासाठी टीएमटी बसगाड्यांवर अवलंबून राहावे लागत आहे. तसेच ठाणे शहरातून ठाणे रेल्वे स्थानकाच्या दिशेने अनेक महिला प्रवासी टीएमटी बसगाड्यांतून प्रवास करतात. ठाणे महापालिका परिवहन उपक्रमाच्या ताफ्यात एकूण ३६४ बसगाड्या आहेत. त्यापैकी उपक्रमाच्या स्वतःच्या १२४ बसगाड्या आहेत. तर, उर्वरित २२० बसगाड्या ठेकेदारामार्फत जीजीसी तत्वावर चालविण्यात येत आहेत. एकूण ३६४ पैकी ३०० बसगाड्या प्रत्यक्षात प्रवासी सुविधेसाठी उपलब्ध होत आहेत. ठाणे शहराची लोकसंख्या मागील काही वर्षांपासून वाढत आहे. सध्या शहराची लोकसंख्या २० ते २५ लाखांच्या घरात गेली आहे. ठाणे महापालिका परिवहन उपक्रमाने अर्थसंकल्पामध्ये ४२७ कोटी १८ लाख रुपयांच्या अनुदानाची मागणी पालिकेकडे केली होती. परंतु महापालिका प्रशासनाने केवळ दोनशे कोटी रुपयांचे अनुदान देण्याचे जाहीर केले आहे. तसेच ६० वर्षांवरील नागरिकांना मोफत तर, महिला प्रवाशांना तिकीटामध्ये ५० टक्के सवलत देण्याचे जाहीर करत महिलांसाठी बसगाड्यांमधील डाव्या बाजूकडील आसने आरक्षित ठेवण्यात येणार असल्याचे पालिकेने स्पष्ट केले होते. या योजनेचा सुभारंभ करण्यात आला आहे.

## गुजराती भाषेत डोंबिवली रेल्वे स्थानकात तिकीट



■ ठाणे, रोहित जैसवाल :
मध्य रेल्वेच्या डोंबिवली रेल्वे स्थानकामध्ये मुद्रित झालेले उपनगरीय रेल्वे तिकीट गुजराती भाषेत असल्याचा दावा समाजमाध्यमांवर केला जात आहे. हे तिकीट डोंबिवली ते घाटकोपर अशा प्रवासाचे असून ६ मार्चला ते मुद्रित झाले होते. मुद्रित करण्यात येणाऱ्या यंत्रामध्ये (प्रिंटर) बिघाड झाल्याने अशी तिकीट प्राप्त झाली आहे. तसेच हे तिकीट गुजराती भाषेत नसल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. हे तिकीट आता माध्यमावर प्रसारित होत प्रवाशांकडून वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत आहे. मध्य रेल्वे मार्गावरून दिवसाला लाखो प्रवासी प्रवास करतात. येथील डोंबिवली स्थानकातील एक तिकीट सध्या समाजमाध्यमांवर प्रसारित झाली आहे. या तिकीटावरील भाषा गुजराती असल्याचा दावा काही प्रवाशांकडून केला जात आहे. डोंबिवली ते घाटकोपर दरम्यानचे हे तिकीट असून या प्रकारामुळे आता समाजमाध्यमावर चर्चा रंगू लागल्या आहेत. तिकिटाविषयी काही नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत. राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून देखील प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. याप्रकाराविषयी ठाकरे गटाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सरकारवर टीका करत आहेत. तर, भाजप आणि महायुतीचे समर्थक हे तिकीट गुजराती भाषेत नसल्याचा दावा करत आहेत. तिकीट मुद्रित करणाऱ्या यंत्रात बिघाड झाल्याने अशी तिकीट प्राप्त झाल्याचा दावा मध्य रेल्वे प्रशासनाने केला आहे. तसेच तिकीट गुजराती भाषेत नसल्याचेही त्यांचे म्हणणे आहे.

## गुजरातमध्ये चाललेला मद्याचा साठा पकडण्यात राज्य उत्पादन शुल्कच्या ठाणे विभागाला यश

■ठाणे, सचिन कदम :
महाराष्ट्रातून गुजरात राज्यात चाललेला पंजाब आणि अरुणाचल प्रदेश निर्मित मद्याचा साठा ठाणे जिल्ह्यातील नाशिक मुंबई रोडवरील कसारा नाका येथे पकडण्यात राज्य उत्पादन शुल्कच्या ठाणे विभागाला यश आले. या कारवाईत पंजाब येथील जसपाल तरसेमलाल सिंग (५०) आणि गुरदयाल गुरदासराम सिंग (४४) या दोघांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून महाराष्ट्र राज्यात विक्रीस बंदी असलेले बनावट विदेशी मद्याचे एकूण ०१ हजार ५०२ बॉक्स, दोन मोबाईल आणि बाराचाकी ट्रक असा ०१ कोटी ३१ लाख ४५ हजार ८० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेची



पूर्वतयारी असल्याचेही सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ विजय सूर्यवंशी यांनी अवैध - नकली - परराज्यातील मद्याविरुध्द कारवाई करण्याच्या निर्देश दिले आहेत. त्यानुसार ठाणे आयुक्त डॉ निलेश सांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक मुंबई रोडवरुन परराज्यातील अवैध मद्याची वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाली. त्या आधारे निरीक्षक दिगंबर शेवाळे यांच्या पथकाने सापळा रचून १३ मार्च रोजी ठाणे जिल्ह्यातील नाशिक मुंबई रोडवरील कसारा नाका येथे ट्रकवर कारवाई केली. यावेळी चालकासह अन्य एक अशाप्रकारे दोघांना अटक करत मद्य साठ्यासह दोन मोबाईल फोन आणि ट्रक असा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई निरीक्षक दिगंबर शेवाळे, दुय्यम निरीक्षक संदिप जरांडे, रिंकेश दांगट, तसेच जवान केतन वझे, नारायण जानकर, हनुमंत गाढवे, संपत वनवे, नानासाहेब शिरसाठ, भाऊसाहेब कराड, विजय पाटील, सागर चौधरी यांनी पार पाडली. ‘ही कारवाई लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेची पूर्वतयारी असल्याचे म्हणता येईल. महाराष्ट्र राज्यामधून गुजरात येथे पंजाब आणि अरुणाचल प्रदेश या राज्यातून हा मद्य साठा जात होता. या मद्याला महाराष्ट्रात बंदी आहे.

## कुणबी नोंदी शोधण्यासाठीच्या शिंदे समितीला 30 एप्रिलपर्यंत मुदतवाढ

■पुणे, अभिजित येरुल्लू :
राज्यातील मराठा समाजास कुणबी, मराठा कुणबी, कुणबी मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्यासंदभार्तील कार्यवाही निश्चित करण्यासाठी स्थापन केलेल्या न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीला राज्य सरकारने ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली आहे. या समितीला हैदराबाद येथील मराठवाड्याशी संबंधित जुन्या निजामकालीन अभिलेखांची विस्तृतपणे तपासणी करावयाची आहे, तसेच मराठवाड्यात पुन्हा एकदा दौरा करून या संदभार्तील अभिलेखांची तपासणी करून मराठा जातीच्या नोंदीची संख्या वाढविण्यासंदर्भात काम करावयाचे असल्याने मुदतवाढ देण्यात आल्याचे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे. मनोज जरांगे यांनी उभारलेल्या आंदोलनानंतर राज्य




सरकारने गेल्या वर्षी ७ सप्टेंबर रोजी माजी न्यायमूर्ती संदेश शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना केली होती. या समितीने मुख्यत्वे मराठवाड्यातील कुणबी, मराठा कुणबी, कुणबी मराठा जातीचे पुरावे शोधण्यासंदभार्तील कार्यवाही निश्चित करणे अपेक्षित होते. यासाठी राज्य सरकारने समितीला एक महिन्याचा अवधी दिला होता. मात्र, मराठवाडा विभागातील सर्व आठ जिल्ह्यांचा दौरा करून जुने निजामकालीन मोडी, उर्दू व फारशी लिपीतील अभिलेख तपासणे, त्याचे विश्लेषण तुलनात्मक अभ्यास करून कायदेशीर बाबींचा एकत्रित अहवाल राज्य सरकारला सादर करण्यासाठी किमान दोन महिन्यांचा कालावधी आवश्यक होता. त्यासाठी राज्य सरकारने २४ डिसेंबरला मुदतवाढ दिली होती. मात्र, त्यापूर्वी राज्य सरकारने या समितीची मराठवाड्यापुरतीची कार्यकक्षा वाढवून संपूर्ण राज्य अशी केली. त्या अनुषंगाने समितीने सर्व महसूल विभागांचे दौरे केले. समितीने आपला दुसरा अहवाल १८ डिसेंबर रोजी सरकारला सादर केला.
समितीला अजूनही हैदराबाद येथील मराठवाड्याशी संबंधित जुन्या निजामकालीन अभिलेखांची विस्तृतपणे तपासणी करावयाची आहे. या अभिलेखांचे राज्यात हस्तांतर करून घेण्यासाठी पुन्हा एकदा हैदराबाद दौरा करावयाचा आहे. तसेच राज्यातील अभिलेखांचा आढावा घ्यायचा आहे. जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी वंशावळ सिद्ध करण्यात येत असलेल्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर ही प्रक्रिया सुलभ करण्यासाठी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. शिंदे समितीला या समितीच्या कामकाजाचा आढावा घ्यावयाचा आहे. ही संपूर्ण कार्यवाही पूर्ण करण्यासाठी सुमारे दोन महिन्यांचा कालावधी लागणार आहे. ही बाब लक्षात घेऊनच राज्य सरकारने समितीला आता ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे यांनी हा शासन निर्णय जारी केला आहे.

## मुंबई लोकलनं विनातिकीट प्रवास करणाऱ्याना आता ‘बॅटमॅन स्क्वाड’ करणार कारवाई

■मुंबई, विशाल पाटील :
मुंबई लोकलमधून विनातिकीट प्रवास करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. बेशिस्त प्रवाशांना पकडण्यासाठी अनेकदा मोहिमा राबवल्या जातात. तर अनेक प्रवाशांचा असा समज आहे की, धावत्या लोकलमध्ये किंवा गर्दी असलेल्या लोकलमध्य तिकीट तपासनीस येत नाही. त्यामुळे अनेक प्रवासी तिकीट न काढताच प्रवास करतात. गदीर्चा फायदा घेऊन अनेक विनातिकीट प्रवासी लोकलमधून प्रवास करतात. तर काहीजण फलाटावरील तिकीट तपासनीसांची नजर चुकवून विनातिकीट प्रवासी रेल्वे स्थानकाबाहेर पडतात. मात्र आता विनातिकीट प्रवास करणं शक्य होणार नाही. कारण पश्चिम रेल्वेने एक विशेष मोहिम राबवणार आहेत. त्यामुळे विनातिकीट प्रवाशांनी आता सावधच व्हा, अन्यथा कारवाई केली जाईल. पश्चिम रेल्वेने मुंबई विभागत एक टीम तयार केली असून रात्रीच्या वेळी कोणत्याही प्रवाशांनी विनातिकीट प्रवास केला तर आता काही खैर नाही. रात्री ८ नंतर तिकीट तपासणी लोकलमध्ये किंवा रेल्वे स्थानाकांवर दिसत नाही. याचा फायदा घेऊन अनेक प्रवासी विनातिकीट लोकलने प्रवास करतात. याचपार्श्वभूमीवर पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागात 'बॅटमॅन स्क्वाड' संघ तयार करण्यात आला आहे. ही टीम रात्रीच्या वेळी लोकलमध्ये तसेच रेल्वे स्थानकांवरत प्रवाशांचे तिकीट तपासणी करणार आहेत. तसेच महिला सुरक्षितेसाठी महिला डब्यात ही त्यांची उपस्थिती असणार आहे. या टिमला 'बॅटमॅन स्क्वाड' असे



नाव देण्यात आले असून हे नाव बॅटमॅन या इंग्रजी शब्दावरून घेतले आहे. याचा अर्थ 'बी अवेयर टीटीई मॉर्निंग एट नाईट' असा आहे.
पश्चिम रेल्वेकडून ही मोहीम ११ मार्चच्या रात्रीपासून सुरू करण्यात आहे. या मोहिमेअंतर्गत आतापर्यंत सुमारे २५०० विनातिकीट प्रवाशांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईत रेल्वेला सुमारे ६.५० लाख रुपयांचा महसूल मिळाला आहे. याबाबत रेल्वे अधिकाऱ्याने सांगितले की, बॅटमॅन टीमचे काम केवळ तिकीट तपासणे नाही तर, त्यांना रात्रीच्या वेळी स्थानकांवर होणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवावे लागणार आहे. बॅटमॅनमुळे या नव्या पद्धतीचा फायदा महिला प्रवाशांना होणार आहे. रात्रीच्या वेळी महिला कोचमध्ये टीटीई तपासणीमुळे एकट्या प्रवाशांना सुरक्षित वाटते म्हणून पश्चिम रेल्वेने हा निर्णय घेतला आहे. रात्रीच्या वेळी धावणाऱ्या एसी लोकलमध्ये तिकीट किंवा सामान्य तिकीट असलेल्या प्रवाशांची गर्दी वाढली. त्यामुळे एसी लोकलमध्ये प्रवास करणाऱ्यांना पाचपट दराने तिकीट खरेदी करून त्रास सहन करावा लागत आहे. सोशल मीडियावर दररोजच्या तक्रारीमध्ये वाढ झाली आहे. त्यानंतर रेल्वेने रात्री बॅटमॅन पथक तैनात करण्याचा निर्णय घेतला आहे. अलीकडेच पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागाने डिजिटल तिकिटांना प्रोत्साहन देण्यासाठी मोहीम सुरू केली होती.

## सहकारी गृहनिर्माण संस्थांना मालकी हक्कासाठी आता दहा टक्के सवलत



■ठाणे, भावना जैन :
राज्यातील शासकीय भूखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थांना मालकी हक्क (भोगवटादार दोन मधून धारणाधिकारी एकमध्ये रूपांतर) बहाल करण्यासाठी शीघ्रगणकाच्या (रेडी रेकनर) १५ टक्क्यांऐवजी दहा टक्के मूल्य आकारण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. ज्या सहकारी गृहनिर्माण संस्था स्वयंपुनर्विकासाचा मार्ग स्वीकारतील, त्यांना फक्त पाच टक्के मूल्य शासनाला अदा करावे लागणार आहे. राज्यात २२ हजार तर मुंबईत तीन हजार सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. या संस्थांना मालकी हक्क देण्यासाठी राज्य शासनाने ८ मार्च २०१९ रोजी अधिसूचना जारी केली होती. या अधिसूचनेनुसार, वैयक्तिक भूखंडधारकांना रेडीरेकनरच्या २५ टक्के तर सहकारी गृहनिर्माण संस्थांना रेडीरेकनरच्या १५ टक्के रक्कम भरून मालकी हक्क मिळणार होता. याबाबत सुरुवातीला तीन वर्षे आणि त्यानंतर आणखी दोन वर्षे मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र ही रक्कम अधिक असल्याची ओरड या सहकारी गृहनिर्माण संस्थांनी केली होती. पाच वर्षांची मुदत ७ मार्च २०२४ रोजी संपुष्टात आली. त्यात आणखी तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. वैयक्तिक भूखंडधारकांनी या योजनेचा लाभ घेतला. शहरातील फक्त एका सहकारी गृहनिर्माण संस्थेने १५ टक्के मूल्य अदा करून मालकी हक्क मिळविला. या योजनेतून शासनाला ६४० कोटींचा महसूल मिळाला आहे. उपनगरात मोठ्या संख्येने असलेल्या गृहनिर्माण संस्थांनी या योजनेला प्रतिसाद दिला नाही. हे मूल्य पाच टक्के करण्यात यावे, अशी या सहकारी संस्थांची मागणी होती. महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी गेल्या विधिमंडळ अधिवेशनात हे मूल्य पाच टक्के केले जाईल, अशी घोषणाही केली. परंतु प्रत्यक्षात अधिसूचना जारी झाली नाही. त्यामुळे हा निर्णय प्रलंबित राहिला होता. अखेरीस झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नव्याने निर्णय घेण्यात आला. मात्र विखेपाटील यांनी विधिमंडळात केलेल्या घोषणेनुसार पाच टक्क्यांऐवजी दहा टक्क्यांची सवलत जारी करण्यात आली. स्वयंपुनर्विकासासाठी इच्छुक असलेल्या संस्थांना पाच टक्के मूल्य भरून मालकी हक्क मिळविता येणार आहे.

## ठाणे महापालिकेने टेंडर प्रक्रियेतून माघार घेणाऱ्या ठेकेदाराची केली कोंडी




■ठाणे, नितीन देवळेकर :
पावसाळ्यात पाणी तुंबून आपत्कालीन परिस्थिती ओढवू नये, यासाठी पालिका प्रशासनाने नालेसफाईची टेंडर प्रक्रिया राबविली. या टेंडर प्रक्रियेत उथळसर, कळवा आणि वागळे इस्टेट या प्रभाग समिती क्षेत्रातील नालेसफाईची कामे करण्याची तयारी ठेकेदाराने दाखविली, मात्र दिवा प्रभाग समितीमधील टेंडरमधून माघार घेणे, ठेकेदाराला चांगलेच महागात पडले आहे. पालिकेने टेंडरमधील अटी व शर्तींचा आधार घेत ठेकेदाराला पुढील तीन वर्षे पालिकेच्या टेंडर प्रक्रियेत सहभागी होण्यास प्रतिबंध केला आहे. पावसाळ्यात नालेसफाई वेळेत पूर्ण न झाल्याने नाले तुंबण्याच्या घटना घडतात. त्यामुळे दुर्घटनादेखील घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे यंदा पावसाळ्यात पाणी तुंबून दुर्घटना घडू नये, यासाठी पालिकेने वेळेत नालेसफाई व्हावी, यासाठी नियोजन आखण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार ठाणे पालिका प्रशासनाने यंदा २०२४-२५ या वषार्साठी पालिका क्षेत्रातील नऊ प्रभाग समितीअंतर्गत मुख्य नाले आणि त्याला जोडणाऱ्या लहान-मोठ्या अशा ३८४.९१ किमी नाल्यांची सफाई करण्यात येणार आहे. त्यासाठी नालेसफाईच्या कामाचे टेंडर प्रसिद्ध केले आहे. मागील वषार्पेक्षा यंदाच्या वर्षी महिनाभर आधीच टेंडर प्रक्रिया राबवली आहे. यावेळी कळवा, उथळसर आणि वागळे इस्टेट या तीन प्रभाग समितीची कामे करण्यात तयार आहे.

## कंत्राटदारांना महालक्ष्मी रेसकोर्सचे भवितव्य ठरवू देऊ नका, मकरंद नार्वेकर यांची मागणी

■मुंबई, दिगंबर जाधव :
महालक्ष्मी रेसकोर्स येथे उभारण्यात येणाऱ्या सेंट्रल पार्कसाठी योजना अंतिम करण्यापूर्वी जागतिक खुली संकल्पना स्पधेर्चे आयोजन करावे, अशी मागणी भाजपचे माजी नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी केली आहे. मुंबई सेंट्रल पार्क खरोखरच मुंबईकरांसाठी असेल, तर त्याची संकल्पना ठरवण्यासाठी कंत्राटदारांनी, नव्हे तर नागरिकांनीच काम करण्याची गरज आहे. त्यात नागरिकांचा सहभाग असायला हवा आणि संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता असावी, अशीही मागणी त्यांनी केली आहे. महालक्ष्मी रेसकोर्सच्या १२० एकर जागेत आंतरराष्ट्रीय दजार्चे भव्य मुंबई सेंट्रल पार्क विकसित करण्यास मंत्रीमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. महालक्ष्मी रेसकोर्स



येथील रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब यांना भाडेपट्ट्याने दिलेल्या भूखंडावरील कराराची मुदत संपुष्टात आल्यामुळे या कराराचे नूतनीकरण करताना या ठिकाणी भव्य उद्यान विकसित करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई महापालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल यांना तसे आदेश दिले आहेत. त्यानुसार या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली. महालक्ष्मी येथील मोक्याच्या जागेवर असलेल्या रेसकोर्सच्या पुनर्विकासाच्या मुद्द्यावर मकरंद नार्वेकर यांनी सुरुवातीपासून आपली भूमिका मांडली आहे. आता पुन्हा एकदा नार्वेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालिका आयुक्त चहल यांना पत्र पाठवून महालक्ष्मी रेसकोर्स येथील सेंट्रल पार्कची योजना आणि संकल्पनेसाठी जागतिक खुली संकल्पना स्पर्धा आयोजित करण्याची मागणी केली आहे. रेसकोर्सच्या पुनर्विकासाचा बहुचर्चित प्रस्ताव रेसकोर्सच्या व्यवस्थापनाने ३० जानेवारी २०२४ रोजी मंजूर केला. पुनर्विकास प्रस्तावाच्या बाजूने ५४० (७६.२७ टक्के) मते पडली, तर प्रस्तावाच्या विरोधात १६८ सदस्यांनी मतदान केले. त्यामुळे या रेसकोर्सच्या भाडेकराराचे नूतनीकरण करण्याचा व रेसकोर्सच्या २२६ एकर जागेपैकी १२० एकर जागा पालिकेला संकल्पना उद्यान (थीम पार्क ) उभारण्याचा मार्ग मोकळा झाला.

# पांढऱ्या केसांच्या समस्येवर करा घरगुती उपाय

**बाजारातील केमिकलयुक्त रंगांमुळे केस काही वेळासाठी काळे होतात, केसांना रंग चढतो, परंतु कालांतराने पुन्हा केस जैसे थे होतात. केमिकलमुळे केसांवर घातक परिणाम होतात. केस अधिक पांढरे होतात, गळतात. केमिकलयुक्त रंगाचा शरीरावरही वाईट परिणाम होत असतो. डोळ्यांची जळजळ, केसात, त्वचेवर खाज येणं, इन्फेक्शन होणं अशा समस्यांमुळे केसांच आरोग्य सुधारण्याऐवजी केस आणि शरीर दोघाचं आरोग्य बिघडवत असतो.**



अकाली केस पांढरे, सफेद होणं अगदी सामान्य बाब असली तरी चिंतेचा विषय झाला आहे. लहान मुलांमध्येही केस पांढरे होण्याचं प्रमाण मोठ्या पटीने वाढलं आहे. केस पांढरे होण्यामागे अनेक कारणं आहेत. आनुवांशिकता, धूळ, प्रदूषण, खाण्यापिण्यात झालेले बदल, अधिक ताण, केसांची काळजी न घेतली गेल्याने केसांचं गळणं, पांढरं होणं अशा समस्या निर्माण झाल्या आहेत. केस पांढरे होण्यावर बाजारात अनेक पर्याय उपलब्ध आहेत. परंतु बाजारातील या पर्यायांमधून फायद्यांऐवजी नुकसान होण्याचाच मोठा धोका असतो. बाजारातील केमिकलयुक्त रंगांमुळे केस काही वेळासाठी काळे होतात, केसांना रंग चढतो, परंतु कालांतराने पुन्हा केस जैसे थे होतात.

केमिकलमुळे केसांवर घातक परिणाम होतात. केस अधिक पांढरे होतात, गळतात. केमिकलयुक्त रंगाचा शरीरावरही वाईट परिणाम होत असतो. डोळ्यांची जळजळ, केसात, त्वचेवर खाज येणं, इन्फेक्शन होणं अशा समस्यांमुळे केसांचे आरोग्य सुधारण्याऐवजी केस आणि शरीर दोघाचं आरोग्य बिघडवत असतो. त्यामुळे केसांच्या पांढऱ्या होणाऱ्या समस्येवर काही घरगुती, आयुर्वेदिक तसंच नैसर्गिक उपायांनी केस काळे करण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. कालांतराने या नैसर्गिक उपायांचा फायदा दिसू लागतो.





**आवळा :** काही सुकवलेले आवळे नारळ्याच्या तेलात चांगले उकळवा. त्यानंतर हे तेल काचेच्या बाटलीत भरून ठेवा. कमीत कमी एक तास किंवा रात्री झोपताना तेल लावून केसांच्या मुळांमध्ये मसाज करा. आठवड्यातून २ ते ३ वेळा तेलाचा वापर करा. सतत तीन महिने हा प्रयोग केल्याने चांगला फायदा होतो. आवळ्यासोबत नारळाच्या तेलाऐवजी बदाम तेलाचाही वापर करा. तेल उकळवताना कमी तापमानावर उकळवा. अधिक तापमानात उकळवताना तेलातील पोषक द्रव्ये नष्ट होतात.

**कडीपत्ता :** केस धुण्यात साध्या किंवा अगदी कोमट पाण्यात कडीपत्त्यांची पानं एक तास आधी टाकून ठेवा. त्याच पाण्याने केस धुवा. आवळ्याप्रमाणे कडीपत्त्यांची पानंही तेलात उकळवून ते तेल लावू शकता. कडीपत्त्यांच्या पानांची पेस्टही केसांना लावू शकता.



**लिंबू :** नारळाच्या तेलात लिंबू पिळून ते लावल्यानेही फायदा होतो. हे मिश्रण पुरुष दाढीलाही लावू शकतात. आठवड्यातून दोन वेळा याचा उपयोग करा.

**ब्लॅक टी आणि मेहंदी :** चहा पावडर पाण्यात उकळून थंड करून केसांना लावल्याने चांगला रंग येतो. चहाऐवजी ब्लॅक कॉफीचाही उपयोग करता येतो. आठवड्यातून ३ वेळा हा प्रयोग करा. मेहंदी भिजवताना त्यात चहाचं उकळलेलं पाणी टाका. याशिवाय मेहंदीत आवळ्याचा रस, लिंबू रस किंवा दही, शिकेकाई पावडर, मेथी दाण्यांची पावडर टाकून मेहंदी लावा याने नैसर्गिक रंग येतो.

**कांदा :** कांद्याचा रस किंवा पेस्ट आठवड्यातून २ ते ३ वेळा लावल्याने चांगला फायदा होतो. केस धुण्याआधी हा उपाय सतत केल्याने कालांतराने केस नैसर्गिकरीत्या काळे होण्यास सुरुवात होते.





**तूप :** गायीचं तूप केसांच्या मुळाशी लावून मसाज केल्याने पांढऱ्या केसांची समस्या कालांतराने नष्ट होते.

## बनाना / ॲपल पॅनकेक

**साहित्य :** २ केळी किंवा १ सफरचंद, १ वाटी कणीक, २ वाट्या तांदळाची पिठी, १ अंडं, अर्धी वाटी बारीक चिरलेला गूळ/ साखर/ पिठीसाखर, अर्धी वाटी सुकामेवा (बदाम, अक्रोड, अंजीर इत्यादी), भाजण्यासाठी तूप.

**कृती :** कणीक आणि तांदळाची पिठी एकत्र करून घ्या. अंडं एका वाटीत फोडून फेटून घ्या. सुकामेवा बारीक चिरून घ्या. अगदी लहान मुलं (दीड-दोन वर्षांची) खाणार असतील तर सरळ किसून घ्या. कणीक आणि तांदळाच्या पिठीत फेटलेलं अंडं, चिरलेला सुकामेवा, गुळ/ साखर यापैकी जे वापरत असाल ते घालून थोडं पाणी घालून हाताने गुठळ्या मोडून ओलसर भिजवा. पातळ अजिबात करू नका. केळं मॅश करा. सफरचंद किसा आणि वरच्या मिश्रणात घाला. आता हळूहळू पाणी घालत घालत नीट ढवळत मिश्रण थोडं सैल करा. साधारणपणे



आपण केकचं बॅटर करतो तेवढं सैल मिश्रण पुरे. डावेने सहज तव्यावर घालता आलं पाहिजे. तवा/ फ्रायपॅन तापवून घ्या. थोडं तूप घाला आणि त्यावर लहान लहान पॅनकेक घाला. तव्याच्या आकाराप्रमाणे २/३/४ एकावेळी होतील. झाकण ठेवा. एका बाजूने झाले की उलटा. खरपूस भाजून घ्या.

**टिप :** ▮अंडं घालायचं नसेल तर बहुतेक बेकिंग पावडर किंवा सोडा घालावा लागेल हलके होण्यासाठी. अंडं घातलं की पोषणमूल्य वाढतंच, पण शिवाय अजून एक फायदा हा की नॉनस्टिक नसेल तरीही तव्यावरून सहज सुटतात.

▮गुळ/ साखर काहीच नको असेल तर खजूर सिरप मिळतं ते घातलं तरी चालेल.

▮फळं ऐनवेळीच मॅश करा. नाहीतर काळी पडतील. बाकी तयारी आधी करून ठेवता येईल.

▮मुलांना डब्यात देता येतात. अगदी लहान मुलांनाही (एक-दीड वर्षाच्या) आवडतात.

# व्हॉट्सॲपचे महिलांसाठी खास फिचर

**व्हॉट्सॲप हे ४०० दशलक्ष वापरकर्ता बेस असलेले सर्वात जास्त वापरले जाणारे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आहे. मागील वर्षांमध्ये व्हॉट्सॲपने वापरकर्त्यांसाठी अनेक रोमांचक वैशिष्ट्ये सादर केली आहेत. महिलांसाठी व्हॉट्सॲप प्रायव्हसीशी संबंधित काही टिप्स जाणून घ्या, ज्याचा वापर करून तुम्ही तुमचे मेसेज पूर्वीपेक्षा अधिक सुरक्षित करू शकता.**

**अज्ञात क्रमांक कसे ब्लॉक करावे आणि तक्रार कशी करावी**

व्हॉट्सॲप हे चॅटिंगसाठी खासगी आणि सुरक्षित ॲप आहे. तथापि बऱ्याच वेळा जेव्हा वापरकर्त्याला अनोळखी नंबरवरून संदेश आणि कॉल येतात, तेव्हा व्हॉट्सॲप वापरकर्त्याला तो नंबर 'ब्लॉक आणि रिपोर्ट' करण्याचा एक सोपा पर्याय देतो. जर तुम्हाला एखाद्याच्या मेसेज किंवा कॉलचा जास्त त्रास होत असेल तर तुम्ही त्याचा नंबर ब्लॉक करून तक्रार करू शकता.

**संदेशाच्या गोपनीयतेवर अधिक नियंत्रण ठेवा**

व्हॉट्सॲपच्या एंड-टू-एंड एन्क्रिप्शनसह तुमचे संदेश, फोटो, व्हिडीओ, व्हॉइस संदेश, दस्तऐवज, स्थिती अद्यतने आणि कॉल सुरक्षित राहतात. जर वापरकर्त्यांना त्यांच्या चॅट्स अधिक सुरक्षित करायच्या असतील, तर यासाठी आणखी अनेक वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत, जसे की अदृश्य संदेश, जे तुम्ही निवडलेल्या वेळेनुसार २४ तास, ७ किंवा ९० दिवसांत पाठवलेले संदेश आपोआप हटवतात. व्ह्यू वन्स फीचर वापरून तुम्ही कोणत्याही युजरला फोटो आणि व्हिडीओ पाठवू शकता. वापरकर्ते त्यांची गोपनीयता वाढवण्यासाठी दृश्य वन्स वैशिष्ट्यासाठी स्क्रीनशॉट ब्लॉकिंग वैशिष्ट्य सक्षम करू शकतात.



**या ग्रुप गोपनीयता सेटिंग्ज सक्षम केल्याची खात्री करा**

व्हॉट्सॲपची गोपनीयता सेटिंग्ज आणि ग्रुप आमंत्रणे वापरकर्त्यांना ग्रुपमध्ये कोण जोडू शकते हे ठरवू देते. तुम्हाला माहिती न देता व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये ॲड केले असल्यास, तुम्ही कोणाच्याही नकळत तो ग्रुप गुप्तपणे सोडू शकता.

**तुमच्या ऑनलाइन माहितीवर नेहमी नियंत्रण ठेवा**

व्हॉट्सॲपवर, वापरकर्ते त्यांची वैयक्तिक माहिती नियंत्रित करू शकतात, जसे की प्रोफाइल फोटो, शेवटचा पाहिलेला, ऑनलाइन स्थिती, आमच्याबद्दल, स्थिती. तुमचा प्रोफाईल चित्र आणि तुमची ऑनलाइन स्थिती कोण पाहू शकते याची गोपनीयतादेखील तुम्ही निवडू शकता.

**तुमचे खाते अशा प्रकारे सुरक्षित करा**

व्हॉट्सॲप वापरकर्त्याला टू-स्टेप व्हेरिफिकेशन फीचर देखील प्रदान करते, ज्याच्या मदतीने तुम्ही तुमचे खाते अधिक सुरक्षित करू शकता. प्रत्येक वेळी तुम्ही दुसऱ्या डिव्हाइसवर लॉग इन करताना तुम्हाला सहा-अंकी पिन आवश्यक असेल. सीम कार्ड चोरीला गेल्यास किंवा फोनमध्ये छेडछाड झाल्यास हे खूप उपयुक्त आहे.


# काकडी उन्हाळ्यात ठेवेल कूल, जाणून घ्या याचे फायदे

काकडी ही उन्हाळ्यात जास्त प्रमाणात दिसून येते. काकडी थंड असल्याने तहान भागवली जाते. अंगाची आग होत असेल तर नुसती काकडी चिरून त्यात साखर घालून खावी. आग थांबते. लघवी साफ होत नसेल उन्हाळी लागली असेल. लघवी वारंवार व थोडी थोडी होते असेल तर काकडी चिरून साखरेबरोबर खावी म्हणजे लघवी साफ होते. काकडीचे बी अंगातील कडकी कमी होण्यासाठी देतात. पुष्कळ दिवस एकसारखा येणारा ताप काकडीच्या बियांच्या काट्याने निघतो.

गुणधर्म : काकडी मधुर, शीतल, पाचक, मूत्रगामी आणि अग्निदीपक तसेच पित्तहारक व थंड आहे. सर्व प्रकारचे मूत्रविकार नाहीसे करते. शरीरातील आग व चक्कर येणे नाहीसे करते.

उपयोग : काकडीचा रस बियांसह गुणकारी आहे. रिकाम्या पोटी एक ग्लास रस घेतल्यास जास्त उपयोगी होतो. काकडीचा उष्मांक (कॅलरीज) कमी असतो. त्यामुळे स्थूलतेवर उपयोग होतो.

फायदे : काकडीचा संधीवात, मूत्रविकार, मधुमेह यासाठी काकडी चांगली, अंगातील आग कमी व्हावी, म्हणून काकडी घेत असल्यास आंबट-गोड फळे व तेलयुक्त पदार्थ त्या प्रयोगात खाऊ नये. प्रयोग दोन महिने करावा. त्याने शरीरावरील गळवे, पुळ्या कमी होतात.



# गरोदर असल्याने एका प्रसिद्ध शोमधून नेहा धुपियाला देण्यात आलेला डच्चू; अभिनेत्रीने शेअर केली कटू आठवण

चित्रपटातून ब्रेक घेतल्यावर वाढलेले वजन अन्गरोदर राहिल्याने झालेले बदल यामुळे नेहाला चित्रपटसृष्टीत पुन्हा कमबॅक करताना आलेले अनुभव तिने नुकतेच एका मुलाखतीदरम्यान शेअर केले आहेत. नेहा धुपिया बॉलिवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. आत्तापर्यंत तिने अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये कामं केली आहेत. सध्या नेहा चित्रपटात झळकत नसली तरी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात सक्रिय असते. निरनिराळे फोटो व व्हिडीओ पोस्ट करत ती चाहत्यांना अपडेट देत असते. चित्रपटानंतर आता नुकतेच नेहाने ओटीटीवरही पदार्पण केले आहे. नुकताच तिचा ओटीटीवर नो फिल्टर नेहा चा दुसरा सीझन प्रदर्शित झाला. या कार्यक्रमातून ती बॉलीवूडमधील अनेक कलाकारांच्या मुलाखती घेते. चित्रपटातून ब्रेक घेतल्यावर वाढलेले वजन अन गरोदर राहिल्याने झालेले बदल यामुळे नेहाला चित्रपटसृष्टीत पुन्हा कमबॅक करताना आलेले अनुभव तिने नुकतेच एका मुलाखतीदरम्यान शेअर केले आहेत. झुमशी संवाद साधताना नेहा म्हणाली, मी जेव्हा या चित्रपटसृष्टीत आले तेव्हा महिला कलाकारांना एका ठराविक साच्यातल्याच भूमिका मिळायच्या. जर तुम्ही त्या साच्यात फिट बसत नसाल तर तुम्ही यासाठी योग्य नाही असं सरसकट ठरवलं जायचं. आता चित्र फार वेगळं आहे, कास्टिंगदेखील अगदी चपखल होतं, पण मला बऱ्याचदा कामावरून काढून टाकण्यात आलं आहे. माझा चेहेरा आणि वजन कमी करण्यासाठी मी दिलेला नकार यामुळे मलाही बऱ्याचदा नकार पचवावा लागला आहे.



## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ३२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | | | | | 6 | | | 7 |
| | | 8 | | 1 | 2 | 3 | | |
| 2 | | | | | | | | 9 |
| 7 | | 1 | | 3 | | 8 | | |
| 5 | | | 7 | | | | 1 | 3 |
| | 4 | | | 2 | | | | |
| | 8 | | 2 | 9 | | 7 | 5 | |
| | | | 5 | | | | 6 | |
| 1 | | | 8 | | 4 | | | |

## उत्तर सुडोकू -३१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 7 | 2 | 5 | 8 | 1 | 6 | 9 | 3 |
| 5 | 3 | 9 | 6 | 4 | 7 | 2 | 1 | 8 |
| 8 | 6 | 1 | 3 | 9 | 2 | 4 | 7 | 5 |
| 2 | 9 | 4 | 7 | 5 | 6 | 8 | 3 | 1 |
| 1 | 5 | 3 | 8 | 2 | 9 | 7 | 4 | 6 |
| 6 | 8 | 7 | 4 | 1 | 3 | 9 | 5 | 2 |
| 7 | 1 | 5 | 2 | 6 | 4 | 3 | 8 | 9 |
| 3 | 2 | 8 | 9 | 7 | 5 | 1 | 6 | 4 |
| 9 | 4 | 6 | 1 | 3 | 8 | 5 | 2 | 7 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

# साखरपुडा, हळद ते साता जन्माचे सोबती! नाव दिलंय खूपच खास

प्रथमेश परब व क्षितिजा घोसाळकर यांचा लग्नसोहळा फेब्रुवारी महिन्याच्या २४ तारखेला थाटामाटात पार पडला. जानेवारी महिन्यात एकत्र केळवणाचा फोटो शेअर करत या जोडप्याने लवकरच लग्नबंधनात अडकणार असल्याचं चाहत्यांना सांगितलं होतं. यानुसार प्रथमेश-क्षितिजाचा १४ फेब्रुवारीला म्हणजेच व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी साखरपुडा, तर २४ तारखेला लग्नसोहळा पार पडला. दोघांच्या लग्नाला सिनेविश्वातील अनेक कलाकारांनी उपस्थिती लावली होती.प्रथमेश आणि क्षितिजाचा साखरपुडा होऊन आज (१४ मार्च) एक महिना पूर्ण झाला आहे. त्यामुळे या खास दिवशी या दोघांनी त्यांच्या लग्नसोहळ्यातील एक खास वल्लरीील्ल व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. यामध्ये दोघांच्या साखरपुड्यापासून ते लग्नापर्यंत सगळ्या पारंपरिक विधींची झलक पाहायला मिळत आहे.प्रथमेश-क्षितिजाच्या लग्नाला दिग्दर्शक रवी जाधव, सिद्धार्थ जाधव हे देखील उपस्थित राहिले होते. लग्नातील प्रत्येक विधीसाठी अभिनेत्याने खास लूक केला होता. प्रथमेशच्या हळदीला सगळ्यांनी एकच जल्लोष केल्याचं या व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे. याशिवाय क्षितिजा सुद्धा साखरपुडा असो किंवा हळद प्रत्येक लूकमध्ये सुंदर दिसत होती. या संपूर्ण व्हिडीओला प्रथमेशच्या गाजलेल्या टाईमपास चित्रपटाची सदाबदार गाणी जोडण्यात आली आहे.प्रथमेश परबने या व्हिडीओला खूपच खास नाव दिलं आहे. प्रथमेश आणि क्षितिजा या जोडीला त्यांचे चाहते प्रेमाने प्रतिजा असं म्हणतात. त्यामुळे या व्हिडीओला सुद्धा अभिनेत्याने प्रतिजा असं नाव दिलेलं आहे.तुज्यामुळे प्रत्येक दिवस मला स्वप्नवत वाचतो. लग्नानंतर खऱ्या अर्थाने माझं स्वप्न पूर्ण झालं आहे. आज एक महिना पूर्ण झाल्याबद्दल क्षितिजा तुला भरभरू प्रेम असं कॅप्शन प्रथमेशने या व्हिडीओला दिलं आहे. दरम्यान, सध्या चाहत्यांसह नेटकरी प्रथमेश-क्षितिजाच्या लग्नसोहळ्यातील व्हिडीओवर कमेंट्सचा वर्षाव करत आहेत.



## दिनविशेष

### १५ मार्च

- १४९३: भारत शोधल्याच्या आनंदात कोलंबस पहिल्या भारत शोध मोहिमेवरुन स्पेनला परतला. प्रत्यक्षात तो भारतात पोहोचलाच नव्हता तर वेस्ट इंडिजवरुन परत गेला होता.
- १५६४: मुघल सम्राट अकबर याने हिंदूंवरील जिझिया कर रद्द केला.
- १६८०: शिवाजी महाराजांचे द्वितीय पुत्र राजाराम यांचा ताराबाई या प्रतापराव गुजर यांच्या मुलीशी विवाह.
- १८२०: मेन हे अमेरिकेचे २३ वे राज्य बनले.
- १८२७: टोरांटो विद्यापीठाची स्थापना झाली.
- १८३१: मुंबई येथे गणपत कृष्णाजी यांनी मराठीतील पहिले छापील पंचांग विक्रीला सुरु झाले.
- १८७७: इंग्लंड व ऑस्ट्रेलियात जगातील पहिला अधिकृत क्रिकेट कसोटी सामना सुरू झाला.
- १८९२: लिव्हरपूल एफ.सी. ची स्थापना झाली.
- १९०६: रोल्स रॉईस या अलिशान कार कंपनीची सुरवात झाली.
- १९१९: हैद्राबादच्या उस्मानिया विद्यापीठाचे उद्घाटन झाले.
- १९३९: दुसरे महायुद्ध झ जर्मनीने झेकोस्लोव्हाकिया गिळंकृत केले.
- १९५६: ब्रॉडवेवरील मार्क हेलिंगर थिएटर येथे माय फेअर लेडी चा पहिला प्रयोग झाला.
- १९६१: ब्रिटिश राष्ट्रकुलातून दक्षिण अफ्रिका बाहेर पडली.
- १९८५: २ट्ठङ्क्ष्र२ृङ्के या इंटरनेट वरील पहिल्या डोमेन नावाची नोंद झाली.
- १९९०: सोविएत संघाने लिथुआनियाचे स्वातंत्र्य नाकारले.
- २००१: भारतीय क्रिकेटपटू व्ही. व्ही. एस. लक्ष्मण यांनी ऑस्ट्रेलिया विरूद्ध कसोटी सामन्यात २८१ धावा काढल्या.
- २०११: सीरियन युद्ध सुरु झाले.
- १९५०: नियोजन आयोगाची स्थापना
- १७६७: अमेरिकेचे ७ वे राष्ट्राध्यक्ष अँड्र्यू जॅक्सन यांचा जन्म. (मृत्यू: ८ जून १८४५)
- १८६०: प्लेग व कॉलरा प्रतिबंधक लसीचा शोध लावणारे रशियन सूक्ष्मजीवशास्त्र डॉ. वाल्डेमर हाफकिन यांचा मुंबई येथे जन्म. (मृत्यू: २६ ऑक्टोबर १९३०)

## भविष्य

**मेष** दूरच्या प्रवासाचा योग येईल. जास्त धाडस करू नका. व्यावसायिक प्रगतीचे दर उघडेल. सर्वांशी गोडीगुलाबीने वागाल.

**वृषभ** व्यावसायिक बदलाचे वारे मनात वाहू लागतील. कामाच्या ठिकाणी तुमचे वर्चस्व वाढेल. मुलांकडून चांगल्या बातम्या मिळतील.

**मिथुन** मनातील आकांक्षा विनासायास पूर्ण होतील. तरुण वर्गाने कसलीही घाई करू नये. मुलांकडून शुभ वार्ता मिळतील. योग्य ठिकाणी गुंतवणूक करावी.

**कर्क** महत्त्वाच्या कागदपत्रांची काळजी घ्यावी. वरिष्ठांना नाराज करू नका. धार्मिक कायार्चा लाभ घ्यावा. भावंडांची काळजी लागून राहील. कलाकारांना प्रसिद्धी मिळेल.

**सिंह** तुमचा मनमोकळा स्वभाव इतरांच्या नजरेत भरेल. वरिष्ठांच्या शाबासकीस पात्र व्हावे. प्रेमप्रकरणातील जवळीक त्रासदायक ठरू शकते. कौटुंबिक स्वास्थ्य जपावे.

**कन्या** मुलांचा व्रात्यपणा वाढू शकतो. कामात चिकाटी ठेवावी लागेल. जोडीदाराची प्राप्ती वाढेल. जुन्या कामातून लाभ संभवतो. अति अपेक्षा बाळगू नका.

**तुला** हाती सोपवलेले काम वेळेत तडीस न्याल. कामात कसलीही घाई उपयोगाची नाही. डोके ठिकाणावर ठेवून वागावे. कौटुंबिक बाजू ध्यानात घेऊन वागावे. घेतलेल्या कष्टाचे चीज होईल.

**वृश्चिक** जोडीदाराशी अनबन टाळावी. स्वकष्टाने आर्थिक बाजू सुधाराल. आपल्या वागण्याने कोणी दुखवणार नाही याची काळजी घ्यावी. सत्य-असत्याची खातरजमा करावी.

**धनु** बाह्यरुपावर भुलू नका. काटकसरीचा मार्ग अवलंबाल. नवीन आव्हानाला सामोरे जाल. तुमची काम करण्याची शक्ति वाढेल. तुमचा आत्मविश्वास वाढीस लागेल.

**मकर** सर्वांशी मधुर वाणीने बोलाल. कौटुंबिक जबाबदारी वाढू शकते. तुमच्या संभाषणाची उत्तम छाप पडेल. कामात अधिक उत्साह येईल. तुमची महत्त्वाकांक्षा वाढीस लागेल.

**कुंभ** व्यवहारी बुद्धिमत्ता वापराल. काही गोष्टींचे धोरण ठरवावे लागेल. सामाजिक गोष्टींची जाणीव ठेवावी. गुरूजनांचा आशीर्वाद लाभेल. तुमची मानमान्यता वाढेल. फसवणुकीपासून सावध राहावे.

**मीन** नैराश्याला बळी पडू नका. फसवणुकीपासून सावध राहावे. मैत्रीचे नाते जपावे. जमिनीच्या कामास गतीमानता येईल. अति श्रमाचा थकवा जाणवेल. जवळचा प्रवास घडेल. जोडीदाराविषयी मतभेद संभवतात.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# मराठी भाषेपल्याड मराठी!

सामान्यांच्या दैनंदिन व्यवहारात मराठीचा मनःपूत वापर केला जातो. बोलीभाषा म्हणून प्रांत, भागपरत्वे आपले म्हणून मराठीचे वैभव, सौष्ठव आहे. ते विविध माध्यमातून लिखित स्वरूपात येते आहे. त्याचे स्वागत करून दखल घेतली पाहिजे.आमच्या शिक्षणांत, अभ्यासक्रमांत, परीक्षांत किंवा वाचल्या-लिहिल्या नानाविध क्षेत्रांत मराठी भाषा म्हणून, वाणी म्हणून वावरते, हे खरेच. प्रगत म्हणवला जाणारा हा मराठीचा चेहरा सर्वांसमोर आहे, हे कोणीही नाकबूल करणार नाहीच.पण, मराठी भाषेच्या पल्याड मराठी बोलणारे केवढे तरी मोठे जग मराठीत, महाराष्ट्रात, सीमावर्ती भागांमध्ये आहे आणि अशा या जगाची सोच मात्र आपण फारशी गांभीयार्ने अजूनही पुरती केली असे जाणवत नाही, हाच खरा कळीचा मुद्दा आहे.अगदी घरांतली चूल पेटावी म्हणून, संसाराचा गाडा चालावा म्हणून, रोजीरोटी मिळावी म्हणून, दैनंदिन उदरनिर्वाह व्हावा म्हणून माणसांची मोठी दुनिया आपल्यांभोवती उभीच असते. या मोठ्या दुनियेचे दळणवळण मराठी भाषेतून सत्वर चालते. त्यांच्या मराठीकडे आपले लक्ष गेले आहे काय? किंवा मराठीच्या प्रवाहांत हे मराठी बोलणारे लोक अभिजात या अशा मराठीचा भाग झाले आहेत काय?आमच्या विद्यापीठांच्या शिक्षणातही 'यांची मराठी' मिसळली गेली काय? हे सगळे प्रश्न खरंतर मराठीचा गजर करताना प्रत्येक मराठी माणसाला पडायला हवेत. त्याशिवाय, मराठी सर्वांची, सर्व प्रवाशांची होईल कशी? हा खरा चिंतनाचा मुद्दा आहे.प्रकाशात असलेल्या मराठीपुढे प्रकाशापलीकडे एक मराठी आहे. उदा. भाजीमंडईत भाज्या विकणारे मराठी स्त्री-पुरुष, ओला उबर-चारचाकी वाहनं चालवणारी मराठी मुलं, गॅरेजमधून कामं करणारी मराठी बोलणारी इथली तरुणाई, ट्रक किंवा बसेस चालवणारा मोठ्या संख्येमधला युवक एवढेच नाहीतर ऑटोरिक्षा किंवा तत्सम साधनं चालवणारी कुठून कुठून आलेली आणि शहरांचा आधार घेऊन कामधंद्यात पडलेली हजारोंच्या संख्येतली मुलं ही शेतकऱ्यांची, भूमीहिनांची, खेड्यांच्या गांवमातीचा गंध मनःपुत जपणारी परंतु मराठी बोलणारी मुलं आहेत.यांच्या या मराठी बोलींचा, त्यांच्या मराठी भाषेंचा 'मीमी मराठी ' असं म्हणणाऱ्या लोकांनी, प्राध्यापकांनी, शिक्षणतज्ज्ञांनी किंवा एकूणात मराठीचे शकट हाकणाऱ्यांनी अजून पुरता अभ्यास केलेला दिसत नाही. मराठी भाषेची विलक्षण समृद्धी ही बाजू अजूनही आमच्या नजरेच्या टापूत आलेलीच नाही. हे विषय म्हणूनच ऐरणीवर आले पाहिजेत. त्याशिवाय, मराठीचे पूर्णत्व सर्वथा मान्य करता यावयाचे नाही.मराठी भाषेपल्याडची हीपण मराठी बावनकशी आहे. ही मराठी ऐश्वर्यवती आहे. शिवाय, ही मराठी जिवंत, प्रवाही आहे. ती मराठी माणसांची आहे. जी, याच माणसांनी सांभाळली आहे. समाजाने, सरकारनेही ही माणसं आणि त्यांची मराठी, यांचे रक्षण अवश्य करायला हवे. कारण, मराठीच्या जयजयकाराला या मराठी लोकांबिगर शोभा नाही; हेपण त्यातलं वास्तव आहे! या संदर्भात साहित्यात काहीशी लक्षणीय घडामोड आढळते.उदा. नाही म्हणायला साहित्यनिर्मितीचा या संदर्भातला दाखला बराचसा समाधान देणारा आहे. मराठी त्यातली बोलीभाषा लेखनांशी जवळ करून मराठीतील कथा, कादंबऱ्या, कविता, आत्मकथा, नाटक, पथनाटक या क्षेत्रांत मराठी माणूस; तसेच त्यांची मराठी यांना साहित्यनिर्मितीत चांगला वाव दिसतो. तरी परंतु, ही बाब तशी पूर्ण समाधानांत मोडणारी नाहीच.जसे की, सीमावर्ती अर्थात महाराष्ट्र-कर्नाटक या प्रदेशांच्या अर्थात निपाणीसारख्या बिंदूजवळ राहणारा मोठा लेखक महादेव मोरे यांनी गॅरेजवाला, ट्रक-टॅक्सी ड्रायव्हर, कामगार, भाजीवाला, मजूर, हातगाडीवाला, गरीब, बेकारी, कलंदर आणि मिळेल ते काम करत पोट भरणारा एक मोठा जनसामान्य असा जनसमुदाय त्यांच्या मराठी बोलीभाषांसह, मिश्रबोलींसह कथा-कादंबऱ्यांमधून फार ताकदीने आणि ठळकपणे साहित्यात आणला. मोरे यांचे हे भाषिक, प्रादेशिक, सांस्कृतिक किंवा सामाजिक-वाङ्मयीन योगदान विलक्षण आहे.मराठीच्या भाषेपल्याड असणाऱ्या जगाच्या दृष्टीने अतुलनीय आणि केवळ श्रेष्ठ अशा पातळीचेच योगदान ठरते. म्हणजेच आजच्या काळाच्या, समाजांच्या, वर्तमानाच्या, भाषांच्या, बोलींच्या पातळीवर हा मराठी भाषेचा सामाजिक आरसा म्हणूनही महादेव मोरे यांचे कर्तृत्व आणि लेखन फारच मौलिक म्हणायला हवे. भाषिक, सामाजिक, सांस्कृतिक ही महादेव मोरेंसारखी ताकद मराठीत आता अपवादभूत अशीच! थातूरमातूर अभ्यासक्रमांच्या पल्याड जावून हा अभ्यास खोल व्हावा. आमच्या मराठी संशोधनाचाही हे या प्रकारचे लेखनविश्व गाभास्थानी अजून आलेले नाही. एवढीतेवढी तोंडपूजा करणारी पोकळ संशोधने होतात; पण 'अक्षर' स्वरूपाचे यातून हाती काहीच मुळी लागत नाही. आमचे पाठ्यक्रम, अभ्यासक्रम रचणारी मंडळे, यांनी या जिवंत-श्रीमंत साहित्यसंपदेकडे आग्रहाने आणि मुळात सकारात्मक दृष्टीने वळण्याची गरज आहे. मात्र हळूहळू बदल होत आहेत. प्रवाहांच्या भाषिक/ बोलीप्रवण साहित्याला हल्ली जागाही मिळत आहे. आशेची ही किरणं काहीसे समाधान देतात; पण इतकेच! तान्हाजी बोऱ्हाडे, आबासाहेब पाटील, विलास पाटील किंवा कालिदास शिंदे, अशोक कोळी, रमेश चिल्ले, कल्पना दुधाळ, केशव खटींग, महेश मोरे- अशी सहजच आठवणारी आजची लेखकमंडळी आपापल्या मुलखांतलीच! पण अस्सल मराठी बोली घेऊन सांस्कृतिक, सामाजिक पातळींवर एक जी साहित्यनिर्मिती करतात; या सर्व लेखनांचा किंवा या प्रकारच्या इतर लेखनांचा मराठी भाषावैभवाच्या दृष्टीने मात्र विचार महत्त्वाचा आहे. तो सहजी सोडून देण्यासारखा नाही. मराठीचा हा मुलुख मराठी भाषावैभवाचा ठळक ऐवज आहे!

# एक काय नि तीन काय?



निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याबद्दल अधिकृतपणे काही सांगण्याची गरजही कोणास वाटत नाही, यातून व्यवस्थेच्या पारदर्शकतेबाबत महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात. निवडणुकांच्या तोंडावर राजीनामा देऊन निवडणूक आयुक्त अरुण गोयल यांनी अनेकांची तशी पंचाईत केली. त्यांचा राजीनाम्याचा निर्णय मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनाच माहीत नव्हता आणि आज राजीनाम्यास तीन दिवस होत आले तरी त्यामागील कारण कोणास ठाऊक नाही. प्रथेप्रमाणे खरे तर आपला राजीनामा त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांकडे देणे अपेक्षित होते. कारण गोयल हे कुमार यांस उत्तरदायी होते. पण तरी त्यांनी राजीनामा पाठवून दिला तो थेट राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे. राष्ट्रपतींनी दुसऱ्या दिवशी तो स्वीकारला आणि तसे जाहीर झाल्यावर गोयल यांच्या राजीनाम्याची बातमी झाली. त्याआधी पश्चिम बंगाल आदी राज्यांच्या निवडणूक तयारी पाहणी दौऱ्यात गोयल हे मुख्य निवडणूक आयुक्तांसमवेत होते. त्या वेळीही त्यांना गोयल यांच्या हालचालींचा सुगावा लागला नाही. या आठवड्याची सुरुवात या दोघांच्या जम्मू-काश्मीर दौऱ्याने होणार होती. त्याआधीच गोयल यांनी राजीनामा दिला. सरकारनेही त्यांच्या राजीनाम्याच्या कारणांसंदर्भात काहीही अधिकृत/ अनधिकृत शब्द काढलेला नाही. लोकसभा निवडणुकांचा हंगाम ऐन भरात येऊ पाहत असताना निवडणूक आयुक्तांचे असे अचानक राजीनामा देणे केवळ बुचकळ्यात पाडणारे नाही. तर त्यातून व्यवस्थेच्या पारदर्शकतेबाबत महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात. सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे हा राजीनामा अनेकांची पंचाईत करणारा ठरतो. याचे कारण असे की हे गोयल महाशय आयोगातील त्यांच्या नेमणुकीपासूनच वादग्रस्त होते. त्यांची नेमणूक अनेकार्थी गाजली. त्यांना स्वेच्छा निवृत्त करून, राजीनामा त्वरेने मंजूर करून या पदावर नेमले गेले. हा सरकारी झपाटा इतका होता की सर्वोच्च न्यायालयानेही तो पाहून आश्चर्य व्यक्त केले होते. त्यांस नेमताना गोयल हे आगामी मुख्य निवडणूक आयुक्त असतील, अशी तजवीज केली गेली होती. म्हणजे ते या पदावरून उतरले नसते तर राजीव कुमार यांच्यानंतर मुख्य निवडणूक आयुक्त बनले असते आणि आणखी तीन वर्षे त्यांस या पदावर राहता आले असते. त्यांच्या राजीनाम्याने हे सर्वच मुद्दे निकालात निघाले. त्यांची नेमणूक ज्या पद्धतीने झाली त्यामुळे ते सरकारधार्जिण्या निवडणूक आयोग यंत्रणेचा आणखी सरकारधार्जिणा चेहरा बनले. परंतु त्यांनी राजीनामा दिला आणि सगळे चित्रच बदलल्यासारखे झाले. म्हणजे ज्या माध्यमांनी त्यांच्यावर टीका केली होती ती माध्यमे गोयल हे कोणी नीतिमान पुरुषाचा अवतार असल्यासारखे भाष्य करू लागली. ही अलीकडची एक नवीनच प्रथा. म्हणजे काँग्रेसादी निधर्मी पक्षांतून भाजपत गेलेला कोणताही नेता भाजपत प्रवेश केल्या केल्या लगेच हिंदुत्ववादी, संस्कृतिरक्षक आदी ज्याप्रमाणे होतो त्याप्रमाणे कारणाविषयी अनभिज्ञ असले तरी कोणी पदत्याग केला रे केला की लगेच तो प्रामाणिक, सडेतोड वगैरे गणला जाऊ लागतो. गोयल यांच्याबाबत हेच होताना दिसते. केंद्र सरकारातील कथित दडपशाही, दांडगाई येथपासून पश्चिम बंगालात निवडणुका हाताळण्यातील मतभेद यापर्यंत अनेक कारणे गोयल यांच्या राजीनाम्यासाठी दिली गेली. म्हणजे माध्यमांनी आपल्याआपल्यातच दिली. जो अधिकारी कालपर्यंत सरकारधार्जिणा गणला जात होता तो अचानक प्रशासकीय अधिकार, नैतिकता आदींचा उद्गाता बनला आणि या राजीनाम्याचे निमित्त साधत व्यवस्थेवर टीका सुरू झाली. येथपर्यंत ठीक. व्यवस्थेवर टीका ही अनेकार्थी क्षम्य ठरेल. पण त्यासाठी गोयल यांच्या राजीनाम्याचे कारण असण्याची गरज नाही. उलट या राजीनाम्याच्या निमित्ताने निवडणूक आयोग नामे यंत्रणेतील पारदर्शकतेचा अभाव हा विषय चर्चेस येणे गरजेचे होते आणि आहेही. कारण अलीकडेच केंद्र सरकारने आयोगाच्या सदस्य नेमणुकीसाठी काही काळ आवश्यक मानली जाणारी सरन्यायाधीशांच्या उपस्थितीची अट कायदा करून काढून टाकली. सरन्यायाधीश, विरोधी पक्षनेता आणि पंतप्रधान अशी त्रिसदस्य समिती या पदांवरील निवड करत असे. आता बहुमताच्या जोरावर केंद्राने कायदा करून यातील सरन्यायाधीशांची आवश्यकता दूर केली आणि त्याजागी मंत्री नेमण्याचा निर्णय घेतला. म्हणजे आता निर्णय दोन विरुद्ध एक असा होईल, हे निश्चित.

कारण कोणत्याही मंत्र्यांची काय हिंमत तो पंतप्रधानांस विरोध करेल! तेव्हा यापुढे नेमणुका कशा होतील, हे स्पष्ट आहे. या समितीतून सरन्यायाधीशांस दूर करण्याचे बहुमती चातुर्य सरकारने दाखवल्यापासून निवडणूक आयोग ही एक घटनात्मक, स्वायत्त यंत्रणा न वाटता एखादे सरकारी खाते आहे की काय अशा पद्धतीने त्याकडे पाहिले जाऊ लागले. या निर्णयास न्यायालयात आव्हान दिले गेले. याचिका दाखल झाली. पण सरकारच्या निर्णयास स्थगिती काही सर्वोच्च न्यायालयाने दिलेली नाही. आताही गोयल यांच्या राजीनाम्यानंतर त्रिसदस्य आयोगातील दोन रिक्त जागा भरण्यासाठी सदर समितीची बैठक बोलावली जाणार असल्याचे वृत्त आहे. पण अद्याप त्यास सरकारकडून अधिकृत दुजोरा देण्यात आलेला नाही. आक्षेप घ्यायला हवा तो या सरकारी सवयीबाबत. म्हणजे वैयक्तिक आयुष्यात मौन हे सर्वार्थसाधन मानले जात असेलही. पण अत्यंत महत्त्वाचे घटनात्मक अधिकार असणाऱ्या निवडणूक आयोगासारख्या कळीच्या यंत्रणेनेही आपल्यातील एका सदस्याच्या राजीनाम्याबाबत मौन पाळावे हे काय साधण्यासाठी आहे हा प्रश्न. सरकारच्या विधि खात्याच्या मंत्री वा अधिकाऱ्यांनीही हा राजीनामा आणि त्यानंतरच्या उत्तरक्रियेबाबत काहीही भाष्य केलेले नाही. यावरून लोकशाही व्यवस्थेत आपण कोणास काही माहिती देणे लागतो याची व्यवस्थेस कशी फिकीर नाही, हे दिसून येते. योग्य माहिती योग्य वेळी न देण्याची परिणती माध्यमे आणि अन्यांकडूनही स्वतःची माहिती तयार करण्यात होते. आताही तेच सुरू आहे. गोयल हे मुख्य निवडणूक आयुक्तांवर नाराज होते येथपासून ते त्यांचे केंद्राशी कसे मतभेद झाले येथपर्यंत वाटेल त्या चर्चा सुरू आहेत आणि प्रत्येक चर्चा छातीठोकपणे सत्यतेची ग्वाही देत आहे. त्याच वेळी एक वर्ग आता निवडणुकांचे काय होणार, असे म्हणून हाय खाताना दिसतो. तेही अयोग्यच. याचे कारण देशातील पहिल्या निवडणुकांपासून म्हणजे १९५२ पासून १ जानेवारी १९९० पर्यंत निवडणूक आयोग एक सदस्यीयच होता. त्यावेळचे मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांनी त्यांच्या आधीपासून असलेले आणि तोपर्यंत वापरले न गेलेले अधिकार वापरून राजकीय नेत्यांस जेरीस आणल्यानंतर संतुलनासाठी तोपर्यंतचा एक सदस्यीय निवडणूक आयोग त्रिसदस्यीय करण्याचा निर्णय झाला. थोडक्यात मुख्य निवडणूक आयुक्तांस वेसण घालण्यासाठी आणखी कोणी नेमण्याची गरज सरकारला वाटली. आता त्याचीही गरज नाही. एकच काय; पण तिघेही खाविंद-चरणारविंदी मिलिंदायमान राहतील अशीच ही परिस्थिती. मधेच कधी अशोक लवासा यांच्यासारखा एखादा(च) अधिकारी नियमांवर बोट ठेवण्याचे धारिष्ट्य सत्ताधाऱ्यांसमोर दाखवतो. पण त्यांची लगेच पदोन्नतीवर गठडी वळता येते. असा एखादा सन्माननीय अपवाद वगळता निवडणूक आयोग आणि सरकार यांच्यातील संबंध तसे सौहार्दाचेच. आणि आता तर निवडणूक आयुक्त निवडण्याच्या समितीतून सरन्यायाधीशांस यशस्वीपणे वगळले गेल्याने या सौहार्दास आव्हान निर्माण होणार नाही, याची हमी सरकार देते. ती जोपर्यंत आहे आणि घटनात्मक पदांवरील व्यक्तींस ताठ मानेने आणि सरळ कण्याने उभे राहण्याचे महत्त्व लक्षात येऊन अशा व्यक्ती जोपर्यंत तसे वागू लागत नाहीत तोपर्यंत निवडणूक आयोग एक सदस्यीय असला काय आणि तीन सदस्यीय असला काय; काय फरक पडणार?

# तुटलेल्या दुभाजकांकडे नगर परिषदेचे दुर्लक्ष

## नागरिकांमधून नाराजी व्यक्त



> गेल्या अनेक महिन्यांपासून हे दुभाजक ठिकठिकाणी तुटलेले आहेत. नगरपालिकेने त्याची तात्काळ दुरुस्ती करावी. जेणेकरून अपघातांना आमंत्रण मिळणार नाही.
> – अनिल मिश्रा, नागरिक

■ **पालघर**: सोनोपंत दांडेकर मार्ग माहीम रोड हा पालघर शहरातील महत्त्वाचा रस्ता आहे. या रस्त्याच्या मधोमध असलेले दुभाजक अनेक दिवसांपासून ठीकठिकाणी तुटलेल्या अवस्थेत आहेत. मात्र पालघर नगर परिषदेला दुरुस्तीकडे लक्ष द्यायला वेळ नाही. एखादा अपघात झाल्यावरच नगर परिषद जागी होणार का? असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

या मार्गावर आयसीआयसीआय बँकेपासून ते सुखसागर इमारतीपर्यंत साधारण २०० मीटर मार्गावर दुभाजक आहेत. मात्र हे दुभाजक अनेक ठिकाणी आपल्या मूळ जागेपासून वाहनांच्या धडकेमुळे बाजूला झाले आहेत. काही दिवसांपूर्वी ते रस्त्यावर आडव्या स्थितीत होते. त्यामुळे दुचाकीस अपघात होण्याची शक्यता आहे. हे लागलीच दुरुस्त करणे आवश्यक असताना त्याकडे नगर परिषद जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. हे दुभाजक रस्त्यात लावताना तिथे विजेची व्यवस्था करणे क्रमप्राप्त आहे. पण तेही नगर परिषदेने केले नाही. त्यामुळे आयसीआयसीआय बँक येथील दुभाजकावर अनेकदा चारचाकी वाहन थेट गेल्याने वाहनांचे नुकसान झाल्याच्या घटना घडल्या आहेत. सरते शेवटी नगरसेवक अरुण माने यांनी तिथे सिग्नल यंत्रणा लावल्याने होणारे अपघात थांबले. मात्र काही ठिकाणी रस्त्यावरून अवजड वाहनांनी वळण घेताना अनेक ठिकाणी हे दुभाजक दिसत नसल्याने तुटलेल्या स्थितीत पाहावयास मिळतात. हा मार्ग वर्दळीचा असल्याने दुभाजकाची दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# नवीन मतदार यादीत चुकीची नावे; माजी नगरसेवकाची तक्रार



■ **डोंबिवली** : लोकसभेची निवडणूक अगदी जवळ आली आहे .त्यातच आता मतदार यादीत असंख्य चूका झाल्याचे निदर्शनास आले आहे . डोंबिवली पूर्वेतील एमआयडीसी निवासी विभागात दुसऱ्या विभागातील नागरिकांची नावे आली आहेत.इतकेच नव्हे तर मतदार यादीत काही नावे ही गुजराती भाषेतून दिली असल्याचे दिसत आहेत. आपल्या महाराष्ट्र राज्यात मराठी ही राज्य भाषा असताना गुजराती भाषेला इतके महत्त्व का दिले जात आहे ? असा सवाल शिवसेनेचे माजी नगरसेवक भालचंद्र म्हात्रे यांनी केला आहे.

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी कल्याण ग्रामीण विधानसभा मतदासंघाच्या याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.त्यामध्ये डोंबिवली एमआयडीसी निवासी विभागातील प्रभाग याद्यांची छाननी केली असता त्यात शंभरापेक्षा अधिक नावे ही त्या प्रभागातील नसल्याचे निदर्शनास आले आहे. माजी नगरसेवक भालचंद्र म्हात्रे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी मतदार याद्यांतील नावे व त्याच्या पत्त्यावर जागेवर जाऊन शोध घेतला असता या नावाच्या व्यक्ती तेथे राहत नसल्याचे समोर आले आहे . मतदार यादीत असंख्य नावे ही दोनदा आली आहेत. काही मृत व्यक्तींची नावे पण आहेत. विशेष म्हणजे मतदार यादीत काही स्थानिक मतदार दिलेल्या पत्त्यावर राहत असूनही त्यांच्यावर डिलीटचा शिक्का आहे.

# थकीत वेतनामुळे ग्रामपंचायत कर्मचारी संपावर


## प्रशासनाने कर्मचाऱ्यांचे आठ महिन्यांपासून थकवले वेतन

■ **अंबाडी**: भिवंडी तालुक्यातील मोठी आणि सधन ग्रामपंचायत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेलार ग्रामपंचायतीचे सर्व कर्मचारी तब्बल आठ महिन्याच्या थकीत वेतनसाठी ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप लावून कार्यालयासमोर बेमुदत संपासाठी बसले आहेत. शेलार येथील ग्रामपंचायत कर्मचारी यांनी आपल्या ८ महिन्यांच्या थकीत वेतानासाठी ग्रामपंचायत कार्यालय शेलार येथे बेमुदत संप सुरू केला असून ग्रामपंचायत कर्मचारी यांनी या संपाद्वारे प्रशासनाकडे आपल्या थकीत वेतनाची,भविष्य निर्वाह निधीची आणि जीवन विमा हप्ते भरण्याची मागणी केली आहे. शेलार ग्रामपंचायत ही विसर्जित झाली असून येथील प्रशासकाची नेमणूक प्रकरण हे उच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने कर्मचाऱ्यांचे वेतन न झाल्याने गटविकास अधिकारी यांना वेतन देण्याचा आदेश न झाल्याने या कर्मचाऱ्यांचे वेतन होऊ शकले नाही. यामुळे कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. संपाबाबत ग्रामपंचायत कर्मचारी यांनी जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी पंचायत समिती भिवंडी, ग्रामविकास अधिकारी शेलार यांना दिनांक ६ मार्च रोजी माहिती दिली होती.तरीही काहीच कार्यवाही न झाल्याने मंगळवारी अखेर ग्रामपंचायत कर्मचारी यांनी कार्यालयाला कुलूप ठोकून संप सुरू केला आहे.



■ संपाला महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियन चे ठाणे जिल्हा अध्यक्ष अजय जाधव, तालुका अध्यक्ष श्याम भोईर माजी सरपंच घनश्याम भोईर सिद्धार्थ भोईर, प्रहार संघटना चेतन जाधव,जिजाऊ संघटना, कृष्णा अधिकारी आणि ग्रामपंचायतचे माजी सदस्य यांनी भेट देऊन पाठिंबा दिला आणि सदर विषय आमदार महेश चौगुले यांना सांगून मार्ग काढण्याची विनंती केली तरीही काहीही निर्णय न झाल्याने पाणीपुरवठा आणि सफाई बंद ठेवण्याचा निर्णय घेऊन आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय कर्मचाऱ्यांनी घेतला आहे. असे झाल्यास ४० हजार लोकसंख्या असलेल्या शेलार गावात नागरिकांचे पिण्याच्या पाण्यासाठी हाल होण्याची शक्यता आहे.

# Union Govt. approves transfer of Air India building to Maharashtra Govt. for Rs 1,601 crore




■ **Mumbai** : The Union government has approved the transfer of the Air India building in Mumbai from AI Assets Holding Coampany Ltd to the Maharashtra government in exchange for a large payment of Rs 1,601 crore. Under the terms of the deal, the Maharashtra government has agreed to discharge dues of Rs 298.42 crore owed by AI Assets Holding Company Ltd to the state government. The Department of Investment and Public Asset Management (DIPAM) has confirmed the arrangement, reported ANI. According to a report by news agency ANI, the Secretary of DIPAM Tuhin Kanta Pandey, in a social media post said that the Government of India had approved the transfer. The tweet read, "GoI has approved the transfer of Air India building, Mumbai of AI Assets Holding Company Ltd to Government of Maharashtra (GoM) at the consideration of Rs.1601 cr. GoM has agreed to waive dues of Rs. 298.42 cr, which would have been otherwise payable by AIAHL to GoM for this transaction." Previously, AI Assets Holdings Ltd, a state-owned organisation that manages Air India's debt and assets following its acquisition by the Tata Group in January 2022, turned down an earlier offer from the Maharashtra government for office space in the Air India building, stated the ANI report. The acquisition of the Air India building is strategically important for Maharashtra, especially given its proximity to 'Mantralaya', the state government's administrative headquarters constructed in 1955, it further added. The ANI report further stated, that as part of the Air India divestment plan, the government absorbed the airline's debt of approximately Rs 45,000 crore along with all non-core assets, including around 111 properties like office buildings and housing colonies. These assets were estimated to have a collective value of Rs 14,718 crore, according to a government statement released in 2021. Meanwhile, another report in PTI, stated that the building, which was constructed in 1974 on state government-owned land and is nearly 46, 470 square meters, will be used as office space by the government.

The report stated that since the 2012 fire in Mantralaya, four major departments--public health, medical education, water supply & sanitation and rural development--have been operating from GT Hospital. It further added that these departments along with som others will likely be moved to the Air India building.

# Mumbai defeats Vidarbha, clinches title for the 42nd time



■ **Mumbai,**

Mumbai on Thursday extended their record by clinching the 42nd Ranji Trophy title. The hosts defeat Vidarbha by 169 runs on the fifth day of the Ranji Trophy final. The fate of the final Mumbai's 48th in the 90 years of the tournament's history here at the iconic Wankhede Stadium was sealed when the hosts set a 538-run target for the visiting team. On the fifth day of the Ranji Trophy final, Vidarbha skipper Akshay Wadkar played a knock of 102 runs with Harsh Dubey scoring 65 runs keeping the hosts at bay after the game resumed at 248 for the loss of five wickets. The team was eventually bowled out for 368. In a contest that ebbed and flowed, Mumbai came out as the winners after Vidarbha frustrated them for long periods of play in the last two days. Skipper Wadkar along with his first century of the year crossed the 600-run mark in this season. Dubey brought up only his second fifty of the first-class career. Together, they forged the longest stand of the innings, consuming 255 balls in 194 minutes from day four until a little after the resumption of the second session on the final day. Wadkar fell shortly after play resumed leg before off Tanush Kotian (4/95 and once the pair was broken, it all ended in a jiffy for the visitors who have now lost the Ranji Trophy final on the third instance after winning two titles. Tushar Deshpande continued employ the short ball to dismiss Dubey (65 off 128 balls, 5 x4s, 2x6s) and Aditya Sarwate, who missed the majority of the game owing to a back spasm. While Kotian cleaned up Yash Thakur (6) for his fourth wicket, Dhawal Kulkarni signed off from all forms of cricket with the final wicket of the game in the form of Umesh Yadav for a fairytale ending.

